मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 22 सप्टेंबर 2024 | पान- 1

# अखेर मुख्यमंत्र्यांना मिळाला पीएमआरडीएसाठी वेळ

## अर्थसंकल्पासोबतच इतरही रखडलेले प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता : 16 महिन्यांनी मुंबईत होणार प्राधिकरणाची 11 वी बैठक

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या अनेक महिन्यांपासून रेंगाळत असलेली पीएमआरडीएची बैठक होणार आहे. बैठकीसाठी मुख्यमंत्री कार्यालयाकडून वेळ जाहीर करण्यात आली आहे. जवळपास पाच वेळा तारीख पुढे ढकलल्यानंतर बैठकीसाठी अखेर सोमवारचा ( २३ सप्टेंबर) दिवस जाहीर करण्यात आलेला आहे. या बैठकीत अर्थसंकल्पाप्रमाणेच इतरही काही रखडलेले प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, विधानसभेची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी प्राधिकरण सभेची बैठक उरकून घेण्यात येत आहे.




राज्य शासनाकडून पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी २०१५ मध्ये पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए) स्थापना करण्यात आली. मुख्यमंत्री हे प्राधिकरणाचे अध्यक्ष असतात. दरम्यान, दरवर्षी होणारे बजेट यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात येते. दरम्यान, अकरावी बैठक ही यंदा खूपच लांबली. जानेवारी महिन्यापासून ही बैठक मुख्यमंत्र्यांच्या वेळेअभावी होऊ शकली नव्हती. दोन वेळा मुख्यमंत्र्यांनी स्वतः ही बैठक रद्द केली होती. तर, काही कारणांनी त्यानंतर ती रद्दच केली. तसेच, मुख्यमंत्री विविध कामांसाठी पुण्यात येणार असल्याने या सभेसाठी वेगळी वेळ काढण्याची विनंती केली होती. मात्र त्यांनी पीएमआरडीएसाठी वेळ दिला नव्हता. अखेर येत्या सोमवारी नगर विकास विभागाकडून त्याचे पत्र प्राधिकरण कार्यालयाला प्राप्त झाले आहे. त्यामुळे ही सभा सोमवारी पार पडेल असे प्राधिकरण कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

राज्याचे मुख्यमंत्री हे प्राधिकरणाचे अध्यक्ष असल्याने त्यांच्या सभेनंतरच प्राधिकरणाच्या कामांना मंजुरी मिळत असते. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जून २०२२ मध्ये पदभार स्वीकारला होता. यापूर्वी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात बैठका वेळेवर झाल्या होत्या. गेल्या वर्षी मे महिन्यामध्ये बैठक झाली होती. त्यानंतर आता थेट ऑक्टोबर महिन्यातच सभा होणार आहे. म्हणजेच जवळपास १६ महिन्यांनी बैठक होईल.

मेट्रो प्रकल्पानंतर पीएमआरडीएकडे आणखी अनेक प्रकल्प प्रलंबित आहेत. त्यापैकी रिंग रोड, इंद्रायणी नदीसुधार प्रकल्प, म्हाळुंगे स्कीम, नियोजित गृहप्रकल्प, रस्त्याच्या कामाबरोबरच साडे आठशे गावांना देण्यात येणाऱ्या निधी या कामांची गती मंदावली आहे. या बैठकीनंतर विविध विषयांना मान्यता मिळाल्यानंतर कामाची गती वाढण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

### विकास आराखडा अडचणीत?

» प्राधिकरणाच्या विकास आराखड्याविरोधात (डीपी) पुणे महानगर नियोजन समितीच्या सदस्यांनी न्यायालयात धाव घेतली आहे. दरम्यान, याबाबत हा डीपी न्यायप्रवीष्ट आहे. न्यायालयाची नुकतीच तारीख पार पडली. मात्र, न्यायालयाने पुढची तारीख दिली आहे. म्हणजेच आता पुढील सहा ऑक्टोबरला पुन्हा सुनावणी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या विकास आराखड्याबाबत प्राधिकरणाची मोठी अडचण निर्माण झाली आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर डीपी होऊ न शकल्याने रद्द होण्याच्या मार्गावर आहे.

# शिवार चौक-गोविंद गार्डन रस्त्याचे 'अर्बन डिझायनिंग' होणार

## पिंपळे सौदागर मधील शिवार चौक ते गोविंद गार्डन चौक रस्त्याचे होणार आधुनिक पद्धतीने रुंदीकरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागरमधील शिवार चौक ते गोविंद गार्डन चौक (कुणाल आयकॉन रोड) रस्त्याला आधुनिक पद्धतीने विकसित करण्यासाठी नुकत्याच झालेल्या स्थायी समिती बैठकीत मान्यता देण्यात आली. ५५ कोटी रुपयांच्या मंजूर रकमेसह तेथील रस्त्यांचे १८ मीटर आणि १२ मीटर रुंदीकरण आणि आधुनिकीकरण करण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे, पिंपळे सौदागरमधील वाहतूक कोंडी कमी करण्याच्यादृष्टीने आणखी एक सकारात्मक पाऊल उचलण्यात आले आहे.

कुणाल आयकॉन रस्ता हा वाकड ते नाशिक फाटा रोड आणि जुन्या मुंबई-पुणे आणि मुंबई-बेंगळुरू महामार्गांसह प्रमुख मार्गांना जोडतो. त्यामुळे, हा शहरातील एक महत्वाचा मार्ग ठरला आहे. या रस्त्याच्या रुंदीकरणास आणि आधुनिकीकरणाच्या अंमलबजावणीला लवकरच सुरूवात होणार असून ३० महिन्यांच्या कालावधीमध्ये प्रकल्प पूर्ण करण्यावर महापालिका भर देणार आहे. पिंपळे सौदागर सारख्या वेगाने वाढणाऱ्या निवासी आणि व्यावसायिक क्षेत्रातील प्रचंड वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी त्यामुळे मदत



होणार आहे.

**प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये -**

प्रकल्पाची किंमत :- ५५ कोटी रुपये (प्रशासकीय मान्यता)

निविदा रक्कम :- ४२.४३ कोटी रुपये

निविदा स्वीकृती रक्कम :- ३३.६७ कोटी रुपये

प्रकल्पाची मुदत :- ३० महिने

निधी स्त्रोत:- अर्बन ट्रान्सपोर्ट फंड (युटीएफ)

> शिवार चौक ते गोविंद गार्डन (कुणाल आयकॉन रोड) रस्त्याच्या विकासामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होईल. रहिवाशांना सुरक्षित आणि सुरळीत प्रवासाचा अनुभव घेता येईल. या रस्त्याचे अर्बन डिझाईननुसार आधुनिकीकरण करण्यात येणार असल्याने पादचारी, सायकलस्वार तसेच अबालवृद्ध नागरिकांसाठी एक सुरक्षित रस्ता तयार करण्यावर महापालिका भर देणार आहे. नागरिकांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन असे पायाभूत सुविधा प्रकल्प कार्यक्षमतेने पूर्ण करण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# आगामी निवडणुकीच्यावेळी सर्व संबंधितांनी चोखपणे कर्तव्य बजावावे : डॉ. सुहास दिवसे

## विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी जिल्हा प्रशासनाने चांगले काम केले असून त्याच पार्श्वभूमीवर आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी सर्वांनी दक्ष राहून चोखपणे कर्तव्य बजावावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, निवासी उप जिल्हाधिकारी ज्योती कदम, निवडणूक विषयक सर्व समन्वय अधिकारी, संबंधित विधानसभा मतदारसंघांचे निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आदी उपस्थित होते.

डॉ. दिवसे म्हणाले, प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय निवडणुकीशी संबंधित सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचे निवडणूक विषयक प्रशिक्षण सत्र आयोजित करावेत. त्यामध्ये प्रत्येक बाबीचे सूक्ष्म नियोजन करून प्रशिक्षण देण्यात यावे. निवडणूक प्रक्रिया सुलभतेने पार



पाडण्याच्या दृष्टीने भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचा आणि नियमांचा अभ्यास करावा.

जिल्हा निवडणूक व्यवस्थापन आराखड्यातील वेळापत्रकाप्रमाणे कामे करावीत.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जास्तीत जास्त मतदार जागृती मोहीम राबवावी. मतदान केंद्रातील बदलाबाबत मतदारांना अवगत करावे. या बाबीवर विशेष लक्ष केंद्रित करून स्वीप व्यवस्थापन कक्षाने जनजागृती विषयक विविध उपक्रम राबवावे.

भरारी पथक (एफएसटी), स्थिर सर्वेक्षण पथक (एसएसटी), व्हिडीओ सर्वेक्षण पथक (व्हिएसटी), व्हिडीओ पाहणी पथक (व्हिव्हिटी) पथकातील सदस्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी दिल्यात.

यावेळी श्रीमती कळसकर यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी करावयाच्या कामाका जाबाबत माहिती दिली.बैठकीत निवडणूक प्रक्रिया, मतदान प्रक्रिया, मतदान केंद्र, कायदा व सुव्यवस्था, निवडणूकविषयक खर्च व्यवस्थापन, आदर्श आचारसंहिता, मनुष्यबळ, साधनसामुग्री, ईव्हीएम स्ट्रॉंग रुम, वेबकास्टिंग, संपर्क आराखडा, मतदार जनजागृती, माध्यम कक्ष, विविध कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

# मावळमध्ये भाजपाचा दुहेरी डाव

## राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या विरोधात प्रचार : अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके यांचा आरोप

**पुणे | प्रतिनिधी**

मावळमध्ये भाजप दुहेरी डाव खेळत असल्याचा आरोप राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके यांनी केला आहे. लोकसभेत महायुतीचा धर्म, राष्ट्रवादी पक्ष आणि अजित पवार महत्वाचे वाटले. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजित पवारांचा पक्ष आणि आमदार नको आहे. मावळ गोळीबाराचा विषय काढून राष्ट्रवादीला मदत करू नका असं आवाहन नागरिकांना केलं जात आहे. असा प्रचार सुरू असल्याचं सांगत शरद पवार गटाचा उमेदवार उभा राहिल्यास त्याला मदत झाली पाहिजे अशी भाजपची भूमिका असल्याचा आरोप शेळके यांनी केला आहे. ते मावळमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते.



आमदार सुनील शेळके म्हणाले, भाजपा पक्षातले काहीजण गावा-गावांमध्ये जाऊन अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मदत करायची नाही, असं सांगत आहेत. मागच्या दीड वर्षात असं ते कधीही बोललेले नाहीत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीचा धर्म महत्त्वाचा आहे. तो पाळून आपण काम केलं पाहिजे. असं म्हणणारी भाजप आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या विरोधात काम करत आहे. लोकसभा निवडणुकांमध्ये महायुतीचा धर्म पाळून आपण काम केलं पाहिजे असं जे बोलत होते. तेच आता मावळमधील गावा-गावांमध्ये जाऊन अजित पवारांनी गोळीबार केला. शेतकऱ्यांना शहीद व्हावं लागलं. त्या पक्षाला मदत करू नका असा प्रचार करत आहेत.

भाजपमधील कार्यकर्त्यांना भडकून दिले जात आहे. त्यांच्या मनात संभ्रम निर्माण केला जात आहे. आपण कसे पक्षाचे निष्ठावंत आहोत हे दाखवलं जात आहे. हे सर्व करत असताना शरद पवार यांचा उमेदवार उभा राहिल्यास त्याला मदत झाली पाहिजे. अशी भाजपची भूमिका दिसत आहे, असा आरोप आमदार सुनील शेळके यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये खासदार श्रीरंग बारणे यांना पहिल्यांदा विरोध करणाऱ्या शेळके यांना देखील आगामी विधानसभा निवडणूक सोपी जाईल असं दिसत नाहीत. महायुतीतच धुसपुस सुरू झाली आहे. शेळके यांच्या उमेदवारीला विरोध होत आहे. त्यांनी देखील भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. यामुळं मावळ विधानसभेत महायुतीत तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे.

### मावळमधील राजकीय संघर्ष वाढण्याची शक्यता?

» मावळ मतदारसंघात सध्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे सुनील शेळके हे आमदार आहेत. मात्र हा मतदारसंघ पारंपरिकदृष्ट्या भाजपकडे राहिला असून ही जागा आम्हालाच मिळावी, अशी मागणी यापूर्वीच मतदारसंघातील माजी आमदार बाळा भेगडे यांनी केली होती. त्यानंतर आता शेळके यांनी भाजपवर थेट आरोप केल्याने मावळमधील राजकीय संघर्ष आणखीनच वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी "परिवर्तन" करणारच!

## स्नेह मेळाव्यातून महिलांचा निर्धार : "परिवर्तना"च्या लढाईत महिला निभावणार महत्त्वाची भूमिका

**पुणे | प्रतिनिधी**

वीज, पाणी, रस्ते यांसारख्या मूलभूत सुविधांची गैरसोय आहेच. मात्र महत्त्वाचे म्हणजे पिंपरी चिंचवड सारख्या औद्योगिक नगरीतून उद्योगधंदे बाहेर पडत आहे. शेजारच्या तळेगाव, चाकण एमआयडीसीमध्ये हीच परिस्थिती आहे. त्यामुळे आपल्या पुढच्या पिढीचे भवितव्य सुरक्षित करायचे असेल तर "परिवर्तन" गरजेचे आहे. हे परिवर्तन घडवून आणण्यासाठी आम्ही महिला पुढाकार घेणार असल्याचा निर्धार महिला शक्तीच्या एकजुटीने केला.

संभाजीनगर येथील 'बर्ड व्हॅली' येथे वैशाली अजित गव्हाणे यांच्या पुढाकारातून गुरुवारी (दि. 19) महिलांसाठी स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला माजी नगरसेविका विनया तापकीर, संगीता ताम्हाणे, वैशाली उबाळे, मंदा आल्हाट, शांता आल्हाट, प्रियांका बारसे, स्वाती साने, शीतल मासुळकर, अश्विनी कांबळे, तृप्ती मोरे, मंगल खाडे, वैशाली वाळके, माया भालेकर, सपना साने, सीमा भालेकर, संगीता आहेर, स्वाती भालेकर, शुभांगी बोऱ्हाडे, शुभांगी लांडे, योगिता रणसुभे, प्रिया कोलते, संगीता जाधव, प्राजक्ता तापकीर, वैशाली तापकीर, स्मिता तापकीर, प्रतिभा तापकीर, ज्योती तापकीर, सृष्टी तापकीर, प्रणिता ताटे, कविता बुर्डे, वैशाली खेडकर आदी उपस्थित होत्या.



या मेळाव्यामध्ये स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनीही मार्गदर्शन केले. मेळाव्यामध्ये महिलांनी स्थानिक प्रश्नांपासून वाढलेल्या बेरोजगारी पर्यंतचे मुद्दे मांडले. या प्रश्नांवर तोडगा काढायचा असेल तर बदल गरजेचा आहे असे मत अनेक महिलांनी व्यक्त केले.

विनया तापकीर म्हणाल्या, घरातील तरुण पिढी शिकलेली आहे. उच्चशिक्षित आहे . चार चार डिग्री हातात असताना मुलांच्या हाताला रोजगार नाही. याला जबाबदार कोण? पाण्याची टंचाई, विजेचा लपंडाव , रस्त्यावरचे खड्डे या प्रश्नाने आम्ही त्रस्त आहोतच .मात्र आमच्या पुढच्या पिढीसमोर

### महिलांनी बेरोजगारीचा मुद्दा आणला ऐरणीवर

» पिंपरी चिंचवड शहरातील अनेक उद्योग बाहेर पडत आहे. हिंजवडी भागांमध्ये ट्रॅफिकचा प्रश्न आहे. हेच प्रश्न चाकण तळेगाव एमआयडीसी समोर आ वासून उभे आहेत. महाराष्ट्रात येणारा प्रत्येक औद्योगिक प्रकल्प बाहेर नेला जात आहे. असेच होत राहिले तर आमच्या पुढच्या पिढीसमोर भवितव्य काय आहे असे गंभीर मुद्दे यावेळी महिलांनी मांडले.या प्रश्नांना आम्हीच उत्तर शोधणार आहोत. परिवर्तन घडवून आमच्या आणि आमच्या पुढच्या पिढीच्या भविष्याचा मार्ग सुकर करणार असल्याचा निर्धार यावेळी महिलांनी व्यक्त केला.

> आज प्रत्येकाला आपले बरे वाईट कळते. शहरात सुरू असलेला भ्रष्टाचार, भोसरी विधानसभेसारख्या मतदार संघाची गेल्या दहा वर्षात झालेली वाताहत, रस्ते, पाणी आणि शिक्षण यासारख्या महत्वाच्या गोष्टींमध्ये झालेला वारेमाप भ्रष्टाचार यामुळे नागरिकांचे होत असलेले हाल आज प्रत्येक जण ओळखून आहेत. त्यामुळे परिवर्तन अटळ आहे
>
> **- अजित गव्हाणे, माजी अध्यक्ष, स्थायी समिती पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# गणेशोत्सवात पीएमपीला 17 कोटींचे उत्पन्न

## नागरिकांची मेट्रोपाठोपाठ पीएमपीला पसंती : अकरा दिवसांत सव्वा कोटी ग्राहकांनी केला प्रवास

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुण्याप्रमाणेच पिंपरी-चिंचवडवासियांनी गणेशोत्सवात पीएमपीच्या प्रवासाला पसंती दिली. मेट्रो मर्यादित धावत असल्याने, अंतर्गत भागात प्रवास करण्यासाठी आणि खर्चाचा हिशोब केल्यामुळे नागरिकांनी पीएमपी प्रवासाला प्राधान्य दिले. गणेशभक्तांना सेवा देण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) जादा बस सेवा सुरू केली होती. त्यामुळे यंदाच्या उत्सवात नातेवाईक, मित्रमंडळी त्यांच्याकडे जाण्यासाठी या ज्यादा ८०० फेऱ्यांचा वापर केला. दरम्यान, यांच्या काळामध्ये मेट्रो प्रमाणेच पीएमपीलाही मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त झाले आहे. तसेच, प्रवासी संख्या सव्वा कोटीपर्यंत पोहोचली होती.

गणेशोत्सव काळात पीएमपीकडून ८०० जादा बस सोडल्या होत्या. प्रशासनाने यंदाच्या वर्षीही गणेशोत्सवासाठी विशेष नियोजन केले. पुण्यातील मध्यवर्ती भागातील वाहतूक बंद झाल्यावर पर्यायी रस्त्याने वाहतूक केली. पहिल्या टप्प्यात ९, १० आणि १६ सप्टेंबर रोजी १६८ जादा बस तसेच ११ ते १५ सप्टेंबर दरम्यान ६२० जादा बस धावल्या. रात्री १२ नंतरही अतिरिक्त बस सोडण्यात आल्या होत्या. त्यालाही मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. पुणे व पिंपरी- चिंचवडमधील विविध स्थानकांतून बसचे नियोजन करण्यात आले होते. मेट्रो प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता यंदा पीएमपी प्रशासनाने व्यवस्थित नियोजन केले होते. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय टळली. गणेशोत्सवात देखावे पाहण्याबरोबरच खरेदीसाठीही प्रवाशांनी पीएमपीचा वापर केला. यामुळे अवघ्या ११ दिवसांत प्रवासी संख्या १ कोटी २८ लाखांपर्यंत पोहोचली. तर, प्रवाशांची गर्दी लक्षात घेता या काळामध्ये १७ हजार ९३ बस धावल्या.

गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे सात सप्टेंबरला आठ लाख प्रवाशांनी प्रवास केला. या काळामध्ये एक कोटीचा महसूल प्राप्त झाला. दरम्यान, सहाव्या दिवसानंतर पुण्यातील मंडळांची देखावे, त्याचप्रमाणे मानाच्या गणपतीचे दर्शनासाठी





### मेट्रो असूनही 7 लाखांनी प्रवासी वाढले

» पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांना जोडणारा तसेच, अंतर्गत भागातही काही ठिकाणी मेट्रो पोहोचली आहे. यंदा गणेशोत्सव काळामध्ये मेट्रो प्रवासी संख्या वाढली असल्याचे सांगण्यात आले. मात्र, दुसरीकडे गेल्या वर्षीपेक्षा यंदा पीएमपीच्या प्रवासी संख्येत वाढ झाल्याचे दिसून आले. गेल्या वर्षी म्हणजेच २०२३ मध्ये गणेशोत्सव काळात प्रवासी संख्या १ कोटी २१ लाख ६२ हजार होती. ती यंदा १ कोटी २८ लाख ५६ हजारापर्यंत पोहोचली. त्यामुळे जवळपास ६ लाख ९३ हजार प्रवासी वाढले होते.

जिल्ह्यातील विविध भागातून भाविक पुण्यात दाखल झाले होते. त्यासाठी त्यांनी प्राधान्याने पीएमपी बसचा प्रवास केला. दरम्यान, सहाव्या दिवशी तब्बल १ कोटी ७८ लाख महसूल मिळाला. तर, या दिवशी प्रवासी संख्या १२ लाखांपर्यंत पोहोचली होती.

अखेरचे तीन दिवस प्रवाशांमध्ये वाढ झाली. तत्पूर्वी १३ आणि १४ सप्टेंबर या दोन दिवशी सर्वाधिक उत्पन्न प्राप्त झाले. अनुक्रमे १ कोटी ८१ लाख तर, १ कोटी ८९ लाख महसूल मिळाला. या दोन दिवशी प्रवासी संख्या साडेतेरा लाखांपर्यंत पोहोचली होती. यानंतर शेवटच्या दोन दिवशी प्रवासी संख्या पुन्हा घटली होती. १६ सप्टेंबर या दिवशी अकरा लाख प्रवाशांनी प्रवास केला. यावेळी एक लाख ५७ हजार उत्पन्न प्राप्त झाले. दरम्यान, गतवर्षीपेक्षा यंदा उत्पन्नात जवळपास एक कोटीची वाढ झाली आहे. त्यामुळे यंदाचा उत्सव पीएमपीला अधिक उत्पन्न मिळून देणारा ठरला. शहराच्या मध्य भागातील रस्ते या काळात सायंकाळनंतर बंद करण्यात येत होते. मात्र पर्याय मार्गाचा वापर करत प्रवाशांना इच्छित स्थळी पोहोचवण्यात आले.

# शहरात विसर्जन घाटांवरून 250 टन निर्माल्य संकलन

## महापालिकेच्या आरोग्य विभागासह स्वयंसेवी संस्थांनीही निर्माल्य संकलनासाठी मदत केली

**पिंपरी | प्रतिनिधी**

अनंत चतुर्दशीच्या दिवशी 'बाप्पा'ला निरोप देत यंदाच्या गणेशोत्सवाची सांगता झाली. या गणेशोत्सवात शहरातील विविध विसर्जन घाटांवरून २५० टन निर्माल्य संकलन झाले आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागासह स्वयंसेवी संस्थांनीही निर्माल्य संकलनासाठी मदत केली.

पिंपरी-चिंचवड शहरात अनंत चतुर्दशीला सर्वत्र आपल्या लाडक्या गणपती बाप्पाला निरोप दिला. महापालिकेने विसर्जन घाटावर दीड दिवसाच्या विसर्जनापासून निर्माल्य संकलनाची व्यवस्था केली होती. गणेश विसर्जन करताना मूर्तीबरोबर हार, फुले, प्रसादही पाण्यात टाकावे, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

मात्र, भाविकांच्या या श्रद्धेपोटी मोठ्या प्रमाणात निर्माल्य नदीत टाकले जात असल्याने जलप्रदूषण होते. भाविकांना हे निर्माल्य विसर्जन घाटावर ठेवलेल्या निर्माल्य कुंडात टाकण्याचे आवाहन महापालिकेकडून



> गणेशोत्सव विसर्जनादरम्यान २५० टन निर्माल्य संकलन झाले आहे. यावर्षी आरोग्य विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेसाठी प्रयत्न केले. या मोहिमेला नागरिक व स्वयंसेवी संस्थांची मदत मिळाली.
>
> **- अजिंक्य येळे, सहायक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

करण्यता येत होते. विसर्जन घाटावर मोठ्या संख्येने आरोग्य कर्मचारी, कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनीही सहभागी होत पालिकेला सहकार्य केले. विसर्जन घाटांवर ठेवलेल्या निर्माल्य कुंडात मोठ्या प्रमाणात निर्माल्य संकलन झाले आहे. यावर्षी २५० टन निर्माल्य संकलन झाले आहे. त्यापैकी ब क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत सर्वाधिक ५५ टन निर्माल्य संकलन झाले असून सर्वात कमी १६ टन निर्माल्य ह प्रभागात संकलित झाले.

**क्षेत्रीय कार्यालयनिहाय निर्माल्य २४८**

अ क्षेत्रीय कार्यालय २४ टन
ब क्षेत्रीय कार्यालय ५५ टन
क क्षेत्रीय कार्यालय ३१ टन
ड क्षेत्रीय कार्यालय ३२ टन
ई क्षेत्रीय कार्यालय ३४ टन
फ क्षेत्रीय कार्यालय २४ टन
ग क्षेत्रीय कार्यालय ३२ टन
ह क्षेत्रीय कार्यालय १६ टन
एकूण २५० टन


# सोसायटी अध्यक्षानेच केली बेकायदा वृक्षतोड

## गेल्या काही दिवसांपासून वातावरणात अचानक बदल नागरिक हैराण : सर्दी, ताप, खोकला आदी आजाराने डोके वर काढले

**पुणे | प्रतिनिधी**

एकीकडे शहरात वृक्ष जगवण्यासाठी पर्यावरणवादी झगडत असताना दुसरीकडे मात्र, आलिशान सोसायट्यांमध्ये बेकायदा वृक्षतोड होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. अशीच एक घटना लष्कर भागातून समोर आली आहे. नेहरू मेमोरियल हॉलसमोरच्या साधू वासवानी कुंज सोसायटीमध्ये जवळपास ३० वर्षांपेक्षा अधिक जुने जांभळाचे झाड कापण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याविषयी रहिवाशांनी महापालिकेकडे तक्रार केली होती. त्यानुसार महापालिकेने सोसायटीच्या अध्यक्षाला नोटीस बजावली आहे.



महापालिकेने नोटिशीचे उत्तर दिले नाही तर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. दरम्यानही, सोसायटीच्या अध्यक्षाने स्वत:च्या अधिकारांचा गैरवापर करीत ही वृक्षतोड केल्याचा आरोप सोसायटीच्या सदस्यांनी केला आहे. विशेष म्हणजे सोसायटीचे अध्यक्ष एका राजकीय पक्षाचे पदाधिकारी आहेत.

मुकेश खेतान हे सोसायटीचे अध्यक्ष आहेत. खेतान हे याच सोसायटीत असलेल्या बिल्डिंग नंबर दोनच्या तळमजल्यावर राहतात. त्यांनी सोसायटीच्या आवारातील वृक्षांच्या फांद्या व धोकादायक विस्तार काढण्यासाठी महापालिकेच्या ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाकडे अर्ज दिला होता. सोसायटीने २४ मे २०२४ रोजी दिलेल्या अर्जानुसार क्षेत्रीय कार्यालयाने ६ जून २०२४ रोजी सोसायटीमधील नारळ, उंबर, जांभूळ, गुलमोहर, कडुलिंब, बदाम, वाळवा आणि अशोकाच्या झाडाच्या धोकादायक फांद्या, विस्तार काढण्यासाठी परवानगी दिली होती. यातील नारळ झाड (११ मीटर उंच) साधारण २५ वर्षे जुने असून उंबराचे झाड (९ मीटर उंच) २५ वर्षे, जांभळाची तीन झाडे (९ मीटर उंच) ३० वर्षे, गुलमोहोर (९ मीटर) ३० वर्षे, कडुलिंब (९ मीटर) २५ वर्षे, बदाम (८ मीटर) २० वर्षे, वाळवा (९ मीटर) ३५ वर्षे, अशोक (११ मीटर) २५ वर्षे वयाची आहेत.

या परवानगी पत्रामध्ये ही झाडे खासगी मिळकतीमधील असून इमारत अथवा रस्त्याच्या दिशेने गेलेल्या फांद्या अथवा विस्तारातून होणारा संभाव्य धोका टाळण्यासाठी, वृक्ष संतुलनासाठी छाटण्यास परवानगी देण्यात आली होती. यामध्ये नारळाच्या झाडाच्या झावळ्या, फळे वेळोवेळी काढण्यासंदर्भात सूचना दिली होती. उंबर आणि जांभळाच्या झाडांच्या ०.४० मीटर बाय ३ ते ४ मीटर लांबीच्या ५ फांद्या छाटण्यास परवानगी देण्यात आलेली होती. यासोबतच, गुलमोहोर, कडुलिंब, बदाम, वाळवाच्या झाडांच्या ४ ते ५ फांद्या छाटण्यास परवानगी देण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले होते. तसेच, अशोकाच्या झाडाची जमिनीपासून ८ मीटर उंची ठेवून विस्तार कमी करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

अशा सूचना असतानाही सोसायटीचे अध्यक्ष मुकेश खेतान यांनी दिलेल्या परवानगीपेक्षा अधिक वृक्ष छाटणी केल्याचे समोर आले आहे. याविषयी सोसायटीमधील काही सदस्यांनी आक्षेप घेतला. याविषयी महापालिकेच्या ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाकडे तक्रार केली. त्यानुसार, वृक्ष प्राधिकरण अधिकाऱ्यांनी सोसायटीमध्ये पाहणी केली. यावेळी ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक वृक्ष छाटणी केल्याचे समोर आले. खेतान यांनी त्यांच्या घराच्या लगतचे जांभळाचे झाड दिलेल्या परवानगीपेक्षा अधिक कापले. या वृक्षाच्या केवळ ४-५ फांद्या छाटण्यास परवानगी दिलेली असताना त्यांनी झाडच पूर्णपणे कापून टाकले. अवघ्या काही फुटांचे झाड शिल्लक ठेवले. झाडांची उंची कमी केल्यावर घरासमोर पत्र्याचे शेडही उभारले. ही बाब लक्षात येताच वृक्ष प्राधिकरण (ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय) विभागाने खेतान यांना नोटीस बजावली आहे.

याविषयी ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाचे वृक्ष प्राधिकरण अधिकारी ज्ञानेश्वर बलकवडे यांनी सांगितले की, सोसायटी अध्यक्षांनी बेकायदा वृक्षतोड केल्याचे निदर्शनास आले आहे. दिलेल्या परवानगीपेक्षा अधिक वृक्ष छाटणी करण्यात आली आहे. पालिकेने केवळ धोकादायक फांद्या व वृक्षांचा विस्तार काढण्यास परवानगी दिली होती. त्यापेक्षा अधिक झाड कापण्यात आले. झाडाची उंची मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात आली आहे. जमिनीपासून अवघे सहा फुटांचे झाड ठेवण्यात आले आहे.

# दस्त नोंदणी कार्यालयाची संख्या वाढणार

## दुय्यम निबंधक कार्यालयातील दस्तनोंदणीची मानके निश्चित : कार्यालयांची संख्या वाढविण्याचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील वाढते नागरीकरण आणि औद्योगीकरणामुळे जमीन, सदनिका, दुकाने आदी स्थावर मिळकतींच्या खरेदी- विक्री व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात नवीन दुय्यम निबंधक कार्यालयांची मागणी नागरिक आणि लोकप्रतिनिधींकडून होत होती.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दुय्यम निबंधक कार्यालयातील दस्तनोंदणीची मानके निश्चित करून कार्यालयांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.



शहरी भागात एका दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये वार्षिक १२ हजार, तर ग्रामीण भागात वार्षिक ८ हजार एवढी दस्तसंख्या अशी मानके निश्चित करण्यात आली आहेत. त्यानुसार या दस्तांपेक्षा अधिक दस्त नोंदणी होणाऱ्या कार्यालयांच्या क्षेत्रात नव्याने दुय्यम निबंधक कार्यालये स्थापन होणार आहेत.

नोंदणी व मुद्रांक विभाग हा शासनास मोठ्या प्रमाणात महसूल मिळवून देणारा दुसऱ्या क्रमांकाचा विभाग आहे. राज्यात सध्या ५२० दुय्यम निबंधक कार्यालये असून, त्या कार्यालयांमार्फत जनतेला दस्त नोंदणी व अनुषंगिक सेवा पुरविल्या जातात. कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात वर्षाला साधारणतः ८ हजारांपेक्षा जास्त दस्त नोंदणीसाठी दाखल झाल्यास त्या कार्यक्षेत्रात नवीन दुय्यम निबंधक कार्यालय निर्माण करण्याची आवश्यकता भासते.

त्याअनुषंगाने राज्यातील विविध जिल्ह्यांतील दुय्यम निबंधक कार्यालयांतील कामाचा आढावा घेऊन त्या भागातील जनतेला योग्य सेवा मिळण्यासाठी राज्यातील सर्व भागात विकेंद्रित स्वरूपात दुय्यम निबंधक कार्यालयातील दस्तनोंदणीचे मानके निश्चित करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय महसूल विभागाच्या कार्यासन अधिकारी प्राची पालव यांनी जारी केला आहे.

### नागरिक, लोकप्रतिनिधींची मागणी

**» मागील काही वर्षांमध्ये विकसनाचे चक्र केवळ मुंबई, ठाणे, पुणे या शहरांपुरते मर्यादित न राहता राज्यातील सर्वच भागांत गतिमान झाले असून, स्थावर मिळकतींच्या व्यवहारांची संख्या राज्यातील सर्वच भागांत कमी- जास्त प्रमाणात वाढत आहे. परिणामी दुय्यम निबंधक कार्यालयांतील दस्त संख्या वाढत असून, काही कार्यालयांत क्षमतेपेक्षा जास्त संख्येने दस्त नोंदणीसाठी दाखल होत असल्याने नागरिक, लोकप्रतिनिधींकडून नवीन कार्यालयांची मागणी होत होती.**